# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/08/2023 (बुधवार) सकाळ

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत २०० मी. अंतरावरील मौजा देवलापार एन. एच. ४४ रोड येथे दिनांक २८/०८/२०२३ चे २१/४० ते २२/१० वा. दरम्यान पोलीस स्टेशन देवलापार येथील पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी दरम्यान एन एच ४४ रोड येथे यातील आरोपी सफारी कंपनीचे वाहन सी. एच.०३ वाय १८१३ चा चालक अज्ञात त्याने त्याचे ताब्यातील वाहनात ०८ गोवंश जनावरे हे अतिशय आखुड नायलॉन दोराने बांधुन एकावर एक रचुन कोणतीही बसण्याची व चारापाण्याची व्यवस्था न करता वाहतुक करतांनी मिळुन आले एकुण गोवंश किंमती ८०,०००/–रु. चा व २) एक सफारी कंपनीचे वाहन सी. एच.–०३/वाय १८१३ असे लिहलेले किंमती २,००,०००/–रु असुन असा एकुण २,८०,०००/–रुपयाचा मुददेमाल जप्त करुन ०८ जिवंत गोवंश पशु वैद्यकिय यांचे कडुन वैद्यकीय उपचार करुन गोवंश गो. विज्ञान केंद देवलापार येथे जमा करण्यात आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– सचिन येळकर ब नं २३३९ पोस्टे देवलापार यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम २७९ सहकलम ११ (१) (घ) (ड) (च) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा सहकलम ५(अ) ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम सहकलम ११९ मपोका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोना शिवा नागपुरे ब नं २१५९ पोस्टे देवलापार मो. नं. ९३०७१६३११२ हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत २० किमी अंतरावर मौजा बेसुर ता. भिवापुर येथे दिनांक २८/०८/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक २९/०८/२०२३ चे ०५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– आशिश दिलीप देवगडे, वय २९ वर्ष रा. बेसुर ता. भिवापुर हे दुकान बंद करून घरी आले व दिनांक २९/०८/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. दुकान उघडण्याकरीता गेले असता लोखंडी शटरचे कुलुप तुटलेले दिसले आतील सामानाची पाहणी केली असता ग्राहकाचे रीपेरींग करीता आलेले १) एम आय कंपनिचा मोबाईल किंमती २५००/–रू. २) सॅमसंग कंपनिचा मोबाईल किंमती ३०००/–रू. ३) नगदी १५०००/– रू असा एकुण २०५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन आतमध्ये प्रवेश करून चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ./६९४ अजित ठाकुर मो. नं. ९४२३६००५५६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर